वाचा:- 1. महाराष्ट्र शासन , ग्राम विकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमाक जिपब / 4820 / प्र.क्र.290 /आस्था 14 दिनांक 7 एप्रिल 2021 नुसार
2. मा.उप सचिव , महाराष्ट्र शासन बांधकाम भवन , 25 मर्झबान पथ , फोर्ट , मुंबई 400001 दिनांक 24 फेब्रुवारी 2023 नुसार
3. ग्राम विकास विभाग , यांचे कडील जिल्हांतर्गत यादी दिनांक 26.03.2023
4. मा.उप सचिव , महाराष्ट्र शासन बांधकाम भवन , यांचे कडील पत्र जिपब -2022 / प्र.क्रं.29(भाग 2 ) आस्था 14 दिनांक 04 मे 2023
5. या कार्यालयीन टिपणी दिनांक /05 /2023

---

जिल्हा परिषद धुळे
( शिक्षण विभाग (प्राथ )
जांक्र जिपधु /आस्था 2अ /जिबकामु / 270/2023
दिनांक 15 /05/2023

**कार्यमुक्त आदेश**

उपरोक्त संदर्भ 1 नुसार जिल्हा परिषद शिक्षक संवर्गाच्या सन 2022-23 ऑनलाईन जिल्हातर्गत बदल्या संगणकीय प्रणालीव्दारे झालेल्या आहेत .

संदर्भ 2 नुसार जिल्हांर्गत बदली झालेल्या शिक्षकांना विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता आपले स्तरावरुन दिनांक 16/05/2023 ते 31.05.2023 या कालावधीत तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी.असे आदेशीत केलेले आहे.

| अ. क्र. | प्राथमिक शिक्षकांचे नाव | कार्यरत जि.प.शाळा व तालुका | पदस्थापनेची जि.प.शाळा व तालुका | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 01 ते 783 | - | - | न्यायप्रविष्ठ बाब असल्याने कार्यमुक्त न करावयाचे शिक्षकांची नांवे<br>------------------------------------<br>1.श्रीम.सुलोचना आत्माराम पाटील , प्राशि मालपूर ता साक्री येथुन जि.प.शाळा वरचे रोषमाळ ता शिरपूर .<br>2.श्रीम. विद्या युवराज बेडीस्कर , प्राशि बभळाज ता शिरपूर यैथुन जि.प.शाळा काईडोकीपाडा ता.शिरपूर |

संदर्भ 3 नुसार बदलीपात्र 01 ते 783 शिक्षकांची यादी पाठविण्यात येत असुन त्या पैकी रकाना 5 मध्ये नमुद शिक्षकांना पुढील आदेश होईपावेतो कार्यमुक्त करण्यात येवू नये.

तसेच उर्वरित आपल्या अधिनिस्त असलेल्या 781 शिक्षकांना त्यांच्या बदली झालेल्या शाळेवर हजर होण्यासाठी या कार्यालयाकडून दिनांक 15.05.2023 रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

तरी आपले तस्तरावरुन बदली शिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्यास विलंब झाल्यास व त्यांच्या वेतनाबाबत प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

( बुवनेश्वरी एस. भाप्रसे,)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धुळे

**अटी व शर्ती**

1. वरील परिशिष्ठातील बदली झालेले शिक्षक बदली झालेल्या शाळेवर हजर न झाल्यास शिस्तभंग विषयक कार्यवाईस पात्र ठरतील.
2. सदरच्या बदलीस पदग्रहण अवधी वा प्रवास भत्ता अनुज्ञेय रहाणार नाही.

3. वरील परिशिष्ठातील बदली झालेले शिक्षक बदली झालेल्या शाळेवर हजर न झाल्यास शिस्तभंग विषयक कार्यवाईस पात्र ठरतील.
4. सदरच्या बदलीस पदग्रहण अवधी वा प्रवास भत्ता अनुज्ञेय रहाणार नाही.
5. बदलीन नियुक्ती दिलेल्या शाळेवर हजर न झाल्यास व परस्पर अंशतः बदल करण्यासाठी विनंती अर्ज या कार्यालयास सादर केल्यास व प्रशासनावर राजकीय व इतर दबाव आणल्यास तसेच फोटो व दिशाभूल करणारी वस्तुस्थिती जाणीवपुर्वक लपवून ठेवणारी माहिती सादर केल्यास संबधितां विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा नियम ( शिस्त व अपील ) नियम 1967 मधील नियम 3 नुसार शिस्तभंग विषयक कारवाईस करण्यात येईल.
6. संबधित शिक्षकांनी पदस्थापनेतच्या ठिकाणी हजर होणे बंधनकारक राहील.अन्यथा विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा नियम ( शिस्त व अपील ) नियम 1967 मधील नियम 3 नुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील.
7. जिल्हातंर्गत बदली पोर्टेलवर भरलेली माहीती चुकीची आढळून आल्यास संदर्भ क्रं.1 मधील 5.10.5 मधील तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात येईल.

( बुवनेश्वरी एस. भाप्रसे,)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि़ल्हा परिषद धुळे

प्रत :- मा. उप सचिव , महाराष्ट्र शासन , ग्राम विकास विभाग , मुंबई यांना माहीतीसाठी सविनय सादर
प्रत :- मा.उपआयुक्त ( आस्थापना ) नाशिक विभाग नाशिक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
प्रत :- मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि ) , जि.प. धुळे यांना माहीतीसाठी सविनय सादर
प्रत :- गट शिक्षणाधिकारी , पंचायत समिती , धुळे , शिदखेडा , साक्री , शिरपूर यांना माहीतीसाठी व कार्यवाहीसाठी.

2/- वरील प्रमाणे आदेशात नमुद केल्यानुसार कालावधीत कार्यमुक्त करण्याची तात्काळ कार्यवाही करावी व बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त केल्याबाबतचा तसेच बदलीने हजर झाले बाबतचा अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावी .